**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः01.07.2024** **वारः सोमवार**

---

**ठळक बातम्या**

- पर्यावरण रक्षणासाठी ‘एक पेड माँ के नाम’ ही मोहीम राबवण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून आवाहन
- देशभरात तीन नवे फौजदारी कायदे आजपासून लागू
- आषाढी वारीसाठी निघालेल्या ज्ञानोबा माऊली आणि तुकाराम महाराजांच्या पालख्या पुण्यात दाखल
- लोणावळयाच्या धबधब्यात पाच जण बुडाले; दोघांचे मृतदेह सापडले, तिघांचा शोध सुरू

आणि

- भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट कसोटीत स्नेहा राणानं 8 खेळाडू बाद करत रचला इतिहास

**मन की बात**

देशातल्या मतदारांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान आपलं संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल पंतप्रधान नरेंद्र

मोदी यांनी त्यांचे आभार मानले. आपल्या तिसऱ्या कार्यकाळात पंतप्रधानांनी काल प्रथमच आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचा हा एकशे अकरावा भाग होता. लोकसभा निवडणुकीत देशातल्या 65 कोटी मतदारांनी मतदान केलं; जगातल्या अन्य कुठल्याही देशात हे घडलेलं नाही, असं सांगत, त्यांनी निवडणूक यंत्रणेचं आणि मतदारांचं अभिनंदन केलं.धरणीमातेच्या रक्षणासाठी आणि आपल्या आईच्या सन्मानार्थ, यावर्षी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्तानं ‘एक पेड माँ के नाम’, म्हणजेच, ‘आईच्या नावाने एक झाड’, ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत देशातील आणि जगभरातील लोकांनी सहभाग घ्यावा; आणि आपल्या आईसमवेत किंवा तिच्या स्मरणार्थ एक झाड लावावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. पॅरीसमध्ये सुरू होत असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारतीय खेळाडूंना त्यांनी शुभेच्छा दिल्या. देशातल्या नागरिकांनीही चिअर फॉर भारत हा हॅशटॅग वापरून आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन द्यावं असं मोदी म्हणाले.आकाशवाणीच्या संस्कृत बातमीपत्राच्या प्रसारणाला 50 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी आकाशवाणीचं अभिनंदन केलं. या भाषेच्या जतन संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन त्यांनी केलं.दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात जल्लोषात साजरा झाला. जगभरात विविध उपक्रमांमधून भारतीय संस्कृतीचा गौरव होत आहे; असं ते म्हणाले. लवकरच सुरू होत असलेली जगन्नाथ यात्रा, अमरनाथ यात्रा आणि पंढरपूरच्या वारीत सहभागी होणाऱ्या भाविकांना पंतप्रधानांनी शुभेच्छा दिल्या.

## फौजदारी कायदे

जुन्या ब्रिटिशकालीन कायद्यांच्या जागी तयार करण्यात आलेले तीन नवीन फौजदारी कायदे देशभरात आजपासून लागू होत आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम असे हे तीन नवे कायदे आहेत. हे तीन नवे फौजदारी कायदे अंमलात आणण्यापूर्वी केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांबरोबर वरचेवर बैठका घेतल्या. त्यामुळे सर्व राज्यं तंत्रज्ञान, क्षमता उभारणी आणि जागृती निर्माण करणं या सर्व पातळयांवर नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी पूर्ण तयारीनिशी सज्ज आहेत. सर्व नागरिकांसाठी अधिक सुलभ, आश्वासक आणि कार्यक्षम न्याय व्यवस्था निर्माण करणं हा या कायद्यांचा उद्देश आहे. गुन्हेगारी घटनांची ऑनलाइन नोंदणी करणं, कोणत्याही पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्याची मुभा तसंच पीडितांना एफआयआरची मोफत प्रत देणं अशा तरतुदींचा नवीन फौजदारी कायद्यांमध्ये समावेश आहे.या नव्या कायद्यांसंदर्भात जनजागृती करण्यासाठी केंद्र सरकारच्या विधी आणि न्याय मंत्रालयानं महाराष्ट्र शासनाच्या सहकार्यानं काल मुंबईत 'भारताची नवी फौजदारी न्याय प्रणाली : एक प्रगतिशील पाऊल' या विषयावर परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कायद्यांमुळे प्रत्येक नागरिकास न्याय मिळणं सुलभ होईल, तसंच फौजदारी न्याय प्रक्रियेत भारत आगामी काळात पथदर्शी ठरेल असा विश्वास केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी या परिसंवादात बोलताना व्यक्त केला. या परिषदेच्या समारोप कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस यांनी मार्गदर्शन केलं. नवे फौजदारी कायदे आधुनिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय मानकांप्रती देशाची वचनबद्धता दाखवणारे आहेत, त्यांच्या अंमलबजावणीमुळे

मानवाधिकारांचं रक्षण, तसंच आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा उंचावेल, असा विश्वास बैस यांनी व्यक्त केला.

**लष्कर प्रमुख**

जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल नवी दिल्लीत नवे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. यापूर्वीचे लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे चार दशकांच्या लष्करी सेवेतून काल निवृत्त झाल्यानं त्यांच्या जागी जनरल द्विवेदी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी 1984 मध्ये लष्कराच्या सेवेत दाखल झाल्यापासून आपल्या 40 वर्षांच्या कारकिर्दीत उत्तर विभागाच्या प्रमुख पदासह इतर अनेक वरिष्ठ पदांवर काम केलं आहे.

**सौनिक नियुक्ती**

वरिष्ठ सनदी अधिकारी सुजाता सौनिक यांची राज्याच्या मुख्य सचिव पदी नियुक्ती झाली आहे. सौनिक यांनी काल मंत्रालयात मावळते मुख्य सचिव नितीन करीर यांच्याकडून पदभार स्वीकारला. सुजाता सौनिक या 1987 च्या तुकडीतील सनदी अधिकारी आहेत. राज्याच्या मुख्य सचिवपदी महिला अधिकारी नियुक्त होण्याची ही पहिलीच वेळ आहे. सुजाता सौनिक यांचा मुख्य सचिवपदाचा कार्यकाळ एक वर्षाचा म्हणजे जून 2025 पर्यंत असणार आहे.

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचं दोन दिवसांच्या

मुक्कामासाठी काल पुण्यात आगमन झालं.ऐकूयात याबाबतचा अधिक वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून ...

**उत्साहपूर्ण वातावरणात काल संध्याकाळी संत तुकाराम महाराजांची पालखी जुन्या मुंबई पुणे रस्त्याने आणि संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी संगमवाडी येथील विसावा घेऊन पुण्यात आली. या दोन्ही पालख्यांचा ज्या ठिकाणी संगम होतो त्या पाटील इस्टेट चौकात नागरिकांनी पावसात देखील पालख्यांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या वतीने दोन्ही पालख्यांचे स्वागत करण्यात आले. माऊलींच्या पालखीना काहीसा नेहमी पेक्षा उशीर झाला तरीही भाविक थांबले होते. सामाजिक संस्थांच्या वतीने पालखी मार्गावर अन्नदान आणि इतर सेवा उपक्रमांचं वारकऱ्यांसाठी आयोजन करण्यात आले होते. काल रात्री उपनगरांत देखील वारकऱ्यांसाठी निवासाची आणि भोजनाची सामाजिक संस्थाकडून सोय करण्यात आली होती. पालख्यांचा आज पूर्ण दिवस पुण्यात मुक्काम असणार आहे. तुकोबांच्या पालखीचा नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात तर ज्ञानोबांच्या पालखीचा भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिर इथे मुक्काम असणार आहे.**

**आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले पुणे**

## मतमोजणी

विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक अशा या चार जागांची मतमोजणी आज होत आहे. या चार जागांसाठी नुकतंच 26 जूनला मतदान झालं होतं. या मतदारसंघामधील प्रशासकीय यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज झाली आहे. नाशिक शिक्षक मतदार संघाची मतमोजणी नाशिक शहरातील अंबड इथल्या केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदामात होणार आहे.

## जिल्हा परिषद साक्षरता कार्यक्रम

पुणे जिल्हा परिषदेच्या शाळातील इयत्ता पहिली ते पाचवीतील विद्यार्थांना भाषा आणि गणित विषय समजणं आता सोपं होणार आहे. प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्या संकल्पनेतून 100 दिवसांचा पायाभूत साक्षरता कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली

आहे. यामध्ये उजळणी वर्ग, जादा तास यासह विविध उपक्रम राबवून विद्यार्थामध्ये मूलभूत क्षमता विकसित करण्यात येणार आहेत. हा उपक्रम 30 सप्टेंबरपर्यंत राबवण्यात येणार आहे.

**बोलक्या अंगणवाड्या**

शिक्षण आनंददायी करण्यासाठी वाशीम जिल्ह्यातील 1074 अंगणवाडी केंद्रांच्या भिंती बोलक्या करण्याचा अभिनव उपक्रम जिल्हा परिषदेनं हाती घेतला आहे. यापैकी 204 अंगणवाडी केंद्रांच्या रंगरंगोटीचं काम पूर्ण झालं असून 468 अंगणवाड्यांचं काम प्रगतीपथावर आहे. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी  दिली. शिक्षणाचा पाया असलेल्या अंगणवाडी केंद्रात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी रमावं या उद्देशानं अंगणवाडी केंद्रांच्या भिंतींवर विविध मनोरंजक तसंच संदेश देणारी चित्रं, सुविचार, म्हणी रेखाटण्यात येणार आहेत.

**निधन**

नांदेड इथले ज्येष्ठ पत्रकार कमलाकर जोशी यांचं काल दुपारी हृदयविकारानं निधन झालं. ते 70 वर्षांचे होते. जोशी यांच्या पार्थिवावर आज सकाळी नऊ वाजता शहरातील गोवर्धन घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. जोशी यांनी दैनिक लोकमतमध्ये अनेक वर्षं तसंच दैनिक गावकरी, तरुण भारत या वृत्तपत्रांमध्ये काही काळ काम केलं होतं. निवृत्तीनंतर ते ब्लॉग तसंच वेगवेगळया वृत्तपत्रातून स्तंभलेखन करत होते.

## भुशी धरण

लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी गेलेले एकाच कुटुंबातील पाच जण काल भुशी धरणात वाहून गेले. हे सर्वजण पुण्यातील रहिवासी होते. यात एक महिला आणि चार लहान मुलांचा समावेश आहे. यापैकी दोघांचे मृतदेह सापडले असून इतरांचा शोध सुरू असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

## महिला क्रिकेट

भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट कसोटी सामन्यात काल भारताची स्नेहा राणा हिनं 8 गडी बाद करून इतिहास घडवला. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर हा सामना सुरू आहे. स्नेहानं आठ तर दीप्ती शर्मानं दोन गडी बाद केले. भारतानं 6 बाद 603 धावांवर डाव घोषित केला होता. त्यानंतर भारताने दक्षिण आफ्रिकेचा डाव 266 धावांत गुंडाळत त्यांना फॉलोऑन दिला. दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या संघाच्या दिवसअखेर 2 बाद 232 धावा झाल्या होत्या.

## हवामान

कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेशात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.विदर्भासाठी जोराचे वारे आणि वीजांसह हा इशारा देण्यात आला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**